**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -४६ विषयाबाबतचे निर्णय

मा.प्रशासक ठराव क्रमांक -१५७ दिनांक – ०८/०५/२०२५

विभाग – नगररचना विभाग

---

**प्रस्तावाचा विषय –** आर.डी.एस.एस. योजने अंतर्गत नविन ३३/१ के.व्हि . विद्युत उपकेंद्र सावेडी स.नं. ८७/१ क / अ / १ब मधील ०४४ आर जागा महावितरणला वितरीत करणे बाबत.

--**--

**ठराव –** विभागाने प्रस्तावित केल्या नुसार,मा.कार्यकारी अभियंता राजग्रा विभाग अहिल्यानगर यांनी आपल्या कार्यालयास आर.डी.एस.एस. योजने अंतर्गत नियोजीत नविन ३३/११ केव्हि विद्युत उपकेंद्रासाठी महावितरणला जागा वितरीत करणे बाबत खालील ठिकाणी उपकेंद्रा साठी मागणी केलेली आहे.

१.सावेडी पंपींग स्टेशन येथील आणि बोल्हेगांव येथील जागा शिल्लक नसून गट क्रमांक ८७/१/क अ १ ब येथील जागा मिळणे बाबत अर्ज केलेला आहे. उपरोक्त विषया बाबत संदर्भिय पत्र् इकडेस प्राप्त झालेले आहे. प्राप्त पत्रानुसार अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी अहिल्यानगर महानगरपालिकेने Public Utility या वापरा करीता आरक्षीत आहे. सदर जागेचे एकुण क्षेत्र् ०.४४ आर एवढे असून सदर ०.४४ आर ही जागा महाविरणला उपलब्ध होवू शकते.

सदर जागेचा मुल्यांकना नुसार सदर जागेचा सन २०२५-२६ चा मुल्यांकनाचा रजिष्ट्रार ऑफिस यांचे कडील मुल्यांकनाच्या तक्त्यानुसार खुल्या जागेचा रजिष्ट्रार ऑफिस यांचे कडील तक्त्यातील विभाग क्रमांक २२९/३ मध्ये दर प्रति चौरस मीटर रू ७४७०/- इतका असून सदर भाग हा विभाग क्रमांक १३/४ मध्ये समाविष्ट आहे. सदर जागेची म्हणजे ४४००.०० चौरस मिटरची किंमत रूपये ३,२८,६८,०००/- येत असून त्यावर १०० टक्के दिलासा रक्कम रूपये ३,२८,६८,०००/- अशी एकुण किंमत ६,५७,३६,०००/- येत असून त्यावर २५ टक्के सॉलेटीयम रक्कम रूपये १,६४,३४,०००/- अशी एकुण ४४००.०० चौ.मी. एकुण रक्कम रूपये ८,२१,७०,०००/- एवढी येते सदरची रक्कम ही सन २०२५२६ च्या मुल्यांकनावर आधारीत काढणेत आलेली आहे.तसेच सदरची रक्कम ही भूसंपादन कायदा अधिनियम २०१३ मधील तरतुदी नुसार व मा.शासन निर्णय क्रमांक ०३/२०१५ प्र.क्र. /३४ /अ -२ दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ व दिनांक २५/०१/२०१७ मधील परिपत्रका नुसार अथवा वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यवाही करणेबाबत

विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास तसेच सदर जागेचा आगाउ ताबा देण्यास मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

------------------------------------------------------------------------------------------------

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -४६ विषयाबाबतचे निर्णय

मा.प्रशासक ठराव क्रमांक -१५८ दिनांक – ०८/०५/२०२५

विभाग – घनकचरा व्यवस्थापन विभाग

---

**प्रस्तावाचा विषय –** अहिल्यानगर महानगरपालिका मालकीच्या बुरूडगांव येथील जैव वैदयकीय कचरा संकलन व विल्हेवाट करणे कामी मे बायोक्लिन सिस्टिम्स (इंडिया ) प्रा. लि. पुणे या संस्थेस मुदतवाढ मिळणे बाबत.

--**--

**ठराव –** विभागाने सादर केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका मालकीच्या बुरूडगांव स. नं. ३४ येथे जैव वैदयकीय कचरा विल्हेवाट करणेकामीचा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. देखभाल दुरूस्ती करणेकामी ई निविदा प्रक्रिया राबवून मे.बायोक्लन सिस्टीम्स (इंडिया ) प्रा. लि. पुणे या संस्थेस दि. २१/०७/२०२३ अखेर ५ वर्षाकरीता कार्यारंभ देण्यात आला होता. तद्नंतर सदर संस्थेने कोविड – १९ कालावधी मध्ये झालेल्या अतिरीक्त खर्चा मुळे त्यांचा झालेला आर्थिक तोटा भरून काढणे करीता सदर संस्थेने पाच वर्ष मुदतवाढ देणे बाबत विनंती पत्र सादर केले आहे. मा. आयुक्त यांनी सदर संस्थेने कोविड १९ कालावधीमध्ये काम समाधानकरक असल्यामुळे मा. आयुक्त यांनी दिनांक २२ जुलै २०२३ ते २१ जुलै २०२५ अखेर दोन वर्ष कालावधी करीता प्रथम मुदतवाढ देण्यात आली आहे.सदर संस्थेची मुदत दि. २१ जुलै २०२५ अखेर संपुष्टात येत आहे. मे बायोक्लन सिस्टीम्स (इंडिया ) प्रा. लि. पुणे या संस्थेने तीन वर्ष कालावधी करीता मुदतवाढ मिळणे बाबत विनंती पत्र सादर केले आहे.

सदर पत्रामध्ये असे नमूद केलेले आहे की, कोविड १९ कालावधीमध्ये झालेल्या अतिरीक्त खर्चाची भरपाई झालेली नाही तसेच मुदतवाढ मिळाल्यापासुन प्रकल्पावरील यंत्रसामुग्री मध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण यांचे सूचनांनुसार बदल करून घेण्यात आलेले आहेत. सदर केलेल्या बदलांमुळे अतिरीक्त खर्च करावा लागला आहे. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या सुचने नुसार बदल झालेले आहेत. सदर केलेल्या बदलामुळे अतिरिक्त खर्च करावा लागला आहे. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील सुचने प्रमाणे जैव वैदयकीय कचरा संकलन करतेवेळी वजन करून घेणे बंधनकारक असल्यामुळे कचरा संकलनासाठी पूर्वीपेक्षा जास्त वेळ लागत आहे. तसेच जैव वैदयकीय कचरा संकलन हे २४ तासांच्या आत करणे आवश्यक असल्यामुळे २४ तासांच्या आत होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर संस्थेस संकलनाकामी वाहनांची संख्या वाढवावी लागणार आहे. सदर सर्व कामांकरिता दिड पट खर्च वाढ होणार आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी प्रकल्पा बाबत केलेल्या सुचने नुसार प्रकल्पामध्ये नुतनीकरण व काही प्रमाणत बदल केल्यामुळे सर्व कामांकरिता ऑपरेटर कडून दिड पट खर्च झालेला आहे. व्यापक जनहित व मनपाचा अनुषंगीक आर्थीक फायदा लक्षात घेता या झालेल्या अतिरिक्त खर्चाची भरपाई झालेली नसल्याने मे.बायोक्लन सिस्टीम्स (इंडिया ) प्रा. लि. पुणे या संस्थेस तीन वर्ष कालावधी करीता मुदतवाढ देण्यास तसेच प्राप्त होणा-या रॉयल्टीच्या रकमेवर प्रतिवर्षी १% दरवाढीस मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका